Containment Zone ID – Raigad C.Z.


महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖ईमेल:tahasildarmahasul@gmail.com❖


क्रमांक : साशा कार्या/ब-५/करोना/रुग्ण्/सुरकिचा पाडा/चाणजे/कमी क्षेत्र/२०२० दिनांक : १५/०६/२०२०.

**वाचले:-**

**१. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०**

**२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०**

**३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४**

**४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६**

**५. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७**

**६. महाराष्ट्र कोव्हीड -१९ उपाययोजना नियम, २०२०**

**७. तहसिलदार उरण यांजकडील पत्र क्र.जमिनबाब/कात-२/चाणजे कंटेनमेंट झोन/२०२०,दिनांक ८/५/२०२०.**

**८. तहसिलदार उरण यांजकडील पत्र क्र.जमिनबाब/कात-२/चाणजे कंटेनमेंट झोन/२०२०,दिनांक ९/५/२०२०.**

**९. या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या/ब-५/कोरोना/रूग्ण/सुरकीचा पाडा/चाणजे उरण/२०२०, दिनांक १०/०५/२०२०.**

**१०. तहसिलदार उरण यांजकडील पत्र क्र.जमिनबाब/कात-२/चाणजे कंटेनमेंट झोन/२/२०२०,दिनांक ११/५/२०२०.**

**११. या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या/ब-५/कोरोना/रूग्ण/सुरकीचा पाडा/वाढीव क्षेत्र/२०२०, दिनांक १३/०५/२०२०.**

**१२. तहसिलदार उरण यांचेकडील पत्र जा.क्र./कोरोना/सुरकिचापाडा/चाणजे/२०२०-२१ दि.१२/०६/२०२०.**

---

<u>आदेश,</u>

ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.९ कडील आदेशांन्वये रायगड जिल्हयातील उरण तालुक्यामधील सुरकिचा पाडा, चाणजे येथे कोरोना बाधीत रूग्ण आढळल्याने रूग्ण रहात असलेल्या घराच्या पूर्वेला- शंकर अर्जून कोळी यांच्या घराशेजारील गल्ली तेसच गोरख आयत्या पाटील व हरिश्चंद्र आयत्या पाटील यांच्या घरामधील गल्ली- पश्चिमेला श्री. प्रभाकर गजानन थळी व रविंद्र धर्मा थळी तसेच श्री. दयानंद होटेल ची गल्ली यांच्या घरामधील गल्ली- दक्षीणेला श्री. किशोर काशिनाथ म्हात्रे व संजय धनाजी चव्हाण यांच्या दुकानामधील गल्ली तसेच मच्छिंद्र बाळाराम पाटील ते जितेंद्र हरि नाखवा यांच्या घरामधील गल्ली व भवानी चौक येथील जेटीकडे जाणारा अर्धा रस्ता- उत्तरेला उर्वरीत सुरकीचा पाडा हा परिसर Containment Zone (करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) म्हणून जाहीर करण्यात आला आहे व उपोद्घातातील अ.क्र.११ कडील आदेशान्वये अ.क्र. ९ मधील कंटेनमेंट झोन मधील क्षेत्र वाढवून ते करोना बाधित रूग्ण रहात असलेल्या घरापासून पूर्वेला डॉ.प्रकाश नाखवा यांचे घराजवळील रस्ता, पश्चिमेला संजय मधुकर नाखवा व सत्यम गजानन कोळी यांचे घरामधील गल्ली, दक्षिणेला जेटी कडील भवानी चौक, उत्तरेला रामेश्वर प्रोव्हीजन स्टोअर बाजूची गल्ली हा वाढीव परिसर हा कंटेनमेंट झोन म्हणून जाहिर करण्यात आला.

ज्याअर्थी, तहसिलदार उरण यांनी दिनांक १२/०६/२०२० रोजीच्या पत्रान्वये मौजे चाणजे, ता. उरण येथील एकूण १३४ कोरोना बाधित रुग्णांपैकी १३१ रुग्ण बरे होऊन रुग्णालयातून घरी परतले असून फक्त ३ रुग्ण घरी परतण्याचे शिल्लक असल्याचे कळविले आहे. त्यामुळे तहसिलदार उरण यांनी उपोद्घातातील ९ व ११ च्या आदेशान्वये जाहिर करण्यात आलेले Containment Zone (करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) हे कमी/ शिथिल करुन उर्वरित ३ रुग्णांच्या घराच्या परिसरातील क्षेत्रापुरते Containment Zone (करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) आदेश होऊन मिळणेस विनंती केली आहे.

सबब तहसिलदार उरण यांनी केलेल्या विनंतीनुसार या कार्यालयाकडील उपोद्घातातील अ.क्र. ९ व ११ कडील आदेशामध्ये नमूद केलेले Containment Zone (करोना विषाणू बाधीत क्षेत्र) व प्रतिबंधित क्षेत्र खालीलप्रमाणे कमी/शिथिल करण्यात येत आहे.

**१. श्री. गोरख आयत्या पाटील यांचे घर- श्री. देविदास विठ्ठल कोळी यांचे घर-पारु मधुकर पाटील यांचे घर- श्री. कुसुभ पंढरीनाथ कोळी यांचे घर-करंजा कासवलेपाडा रस्ता.**

**२. श्री. लिलाधर तुकाराम कोळी यांचे घर- श्री. जनार्दन बापू कोळी यांचे घर- श्री. रघुनाथ गिरणे यांचे घर- श्री. प्रभाकर कृष्णा कोळी यांचे घर- जरिमरी मंदीर- सुरकीचापाडा कासवलेपाडा मधील रस्ता.**

**३. श्री. श्याम कोळी यांचे घर व आजुबाजूचा परिसर कोळी- कोंढरीपाडा (सदरचे घर वेगळे/ अलग आहे).**

या कार्यालयाकडील आदेश दिनांक १०/०५/२०२० व दिनांक १३/०५/२०२० मधील इतर निर्देश व घोषित करणेत आलेल्या Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंध क्षेत्रासाठी दिनांक १०/०५/२०२० व १३/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये दिलेले निर्देश/सूचना हे वरील परिसरासाठी/क्षेत्रासाठी कायम राहतील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द आपती व्यवस्थापन अधिनियम , २००५ कलम ५१ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ७१ , १३९ तसेच भारतीय दंड संहिता ( ४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ अन्वये कारवाई करण्यात येईल.

जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग
Collector Raigad-Alibag

सही --
**(निधी चौधरी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**

प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- आयुक्त, महानगरपालिका पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- उप विभागीय अधिकारी पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी ,
प्रत :- मुख्याधिकारी उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- वरीष्ठ पोलीस निरीक्ष्क, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- गट विकास अधिकारी, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांना आवश्यक त्या प्रसिध्दिसाठी

(रविंद्र मठपती)
उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा
नोडल अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड